# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.७५८ दिनांक ३०.१०.२०२०

## महिलांवर अत्याचार करुन त्याचे अश्लील व्हिडीओ तयार करुन इंटरनेटवर अपलोड करणा-या सराईत आरोपीला जेरबंद करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश

पालघर जिल्हयातील विक्रमगड पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्रमांक ८९/२०२० भादंविसंक. ३७६(एन) (२),४५२,५०६ सह माहीती तंत्रज्ञान अधिनियम कलम २००० चे कलम ६७ तसेच वालीव पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्रमांक ७४३/२०२० भादंविसक.३७६ (एन) (२), ५०६ या गुन्हयातील फिर्यादी महिला यांना फुस लावून त्यांचेवर लैंगिक अत्याचार करुन त्याचा व्हिडीओ तयार करुन सदरचे व्हिडीओ इंटरनेटवर अपलोड केल्याने आरोपी मिलिंद अनिल झडे वय ३२ वर्षे रा.मु.पोचाडे ता.विक्रमगड जि.पालघर याचेविरुध्द वरीलप्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

महिलांवरील अत्याचाराचे वरील दोन्ही गुन्हयातील आरोपी हा गुन्हे दाखल झाल्यापासुन जव्हार विक्रमगड परीसरातील डोंगरात व जंगलात वास्तव करुन राहत असल्याने तो मिळून येत नसल्याने मा.पोलीस अधीक्षक,पालघर यांनी गुन्हयातील आरोपीचा शोध घेवून तात्काळ अटक करणेकामी प्रभारी अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा,पालघर यांना आदेशीत केले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या बोईसर युनीटचे सहा.पोलीस निरीक्षक भीमसेन गायकवाड यांनी पथक तयार करुन आरोपीचे सध्याचे ठावठिकाण्याची माहीती घेवून कसोशीने शोध चालू केला.

आज रोजी वरील गुन्हयातील आरोपी मिलिंद अनिल झडे हा पाचमाड येथे येणार असल्याची खात्रीशीर बातमी मिळाल्याने सहा.पोलीस निरीक्षक भीमसेन गायकवाड यांनी पथकासह सापळा रचुन त्यास पाचमाड नाका येथून ताब्यात घेतले आहे.

सदरची कारवाई मा.दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक पालघर,मा.प्रकाश गायकवाड,अपर पोलीस अधीक्षक,पालघर, मा.रविंद्र नाईक, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा,पालघर यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक भीमसेन गायकवाड,पोहवा.दिपक राऊत, संदीप सरदार, संदीप सुर्यवंशी, पोलीस नाईक नरेंद्र पाटील यांनी केली आहे.

Scanned with CamScanner